पुण्य नगरी ६ ■ बुधवार, ३१ ऑगस्ट २०२२ ■ कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजमध्ये क्रीडा दिन उत्साहात

**कोल्हापूर** : विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. डॉ. श्रुती जोशी यांच्या हस्ते हॉकी खेळाचे जादूगार मेजर ध्यानचंद सिंग यांच्या प्रतिमेचे पूजन आणि क्रीडा भित्तीपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ जोशी म्हणाल्या, मेजर ध्यानचंद यांच्याप्रमाणे देशाचे नाव क्रीडा क्षेत्रात उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रात शारीरिक तंदुरुस्ती व खेळाला महत्व देणे गरजेचे आहे. विद्यापीठाची तलवारबाजी खेळाडू क्रांती बेनाडे हिने ध्यानचंद यांच्याविषयी माहिती दिली. डॉ. श्रुती जोशी, प्रा. शिल्पा भोसले, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांच्या हस्ते नॅशनल खेळाडूंना ट्रॅकसूट देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यासाठी प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, सुरेश चरापले यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक जिमखाना चेअरमन प्रा. किरण पाटील यांनी केले. आभार प्रा. सहिदा कच्छी यांनी मानले.

बुधवार, ३१ ऑगस्ट २०२२ MY कोल्हापूर पुढारी ३

# विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. आयक्यूएसी प्रमुख डॉ.श्रुती जोशी यांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व क्रीडा भित्तीपत्रिकेचे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी त्यांनी उपस्थित खेळाडूंना मेजर ध्यानचंद यांच्याप्रमाणे भारताचे क्रीडा क्षेत्रात नाव उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक जिमखाना चेअरमन प्रा. किरण पाटील यांनी केले. विद्यापीठ तलवारबाजी खेळाडू क्रांती बेनाडे हिने ध्यानचंद यांच्याविषयी माहिती दिली. प्रा. डॉ. श्रुती जोशी, प्रा शिल्पा भोसले, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांच्या हस्ते नॅशनल खेळाडूंना ट्रॅकसूट देण्यात आले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले.